# प्रेसनोट

पोलीस ठाणे वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग येथील पोलीस नाईक श्री. मारूती साखरे व पोलीस उप–निरीक्षक श्री. सुरज पाटील वयांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सिंधुदुर्ग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३८/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.मारूती संतराम साखरे, पोलीस नाईक ब.नं.१०२३<br>२) श्री. सुरज शिवाजी पाटील, पोलीस उप–निरीक्षक,<br>दोन्ही नेमणुक पोलीस ठाणे वैभववाडी जि.सिंधुदुर्ग |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाच रक्कम | २०,०००/– रूपये (पहिला हफ्ता) |

**थोडक्यात हकीगत:-**

यातील तक्रारदार यांनी वैभववाडी पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीवरून वैभववाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ३६/२०२३ भादवी ३२४ दि. १८/०४/२०२३ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे अनुषंगाने तपासी अधिकाकरी आलोसे श्री.पाटील, पोउपनि व पोना/१०२३, श्री. साखरे, दोन्ही नेमणुक वैभववाडी पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे विचारपुस करून यातील फिर्यादी यांचेविरूध्द भा.द. वि. कलम ३७६ चा गुन्हा दाखल करतो, नाहीतर पैसे दे असे सांगुन तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रू. लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३०,०००/- रू. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. पाटील, पोउनि व श्री. साखरे, पोना यांचेविरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक १९/०४/२०२३ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १९/०४/२०२३ व दि. २०/०४/२०२३ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. साखरे, पोना/१०२३ व पोउनि/श्री.पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रू. लाचेची मागणी करून लाचेचा पहीला हप्ता रू. २०,०००/- घेवुन येण्यास सांगितले असल्याने लोकसेवक श्री. साखरे व श्री. पाटील यांचेविरूध्द दि. २०/०४/२०२३ रोजी वैभववाडी पोलीस ठाणे येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता त्यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेचा पहीला हप्ता रू. २०,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.

वरील कारवाई श्री. शिवाजी पाटील, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

---

**मार्गदर्शन अधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि ठाणे परिक्षेत्र ठाणे**

संपर्क पत्ता :–ला.प्र.वि. सिंधुदुर्ग, कुडाळ तहसीलदार कार्यालयासमोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, (४१६५२०)
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :– १०६४ ९
दुरध्वनी क्र. :– ०२३६२–२२२२८

(शिवाजी पाटील)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग